## सुर्य आणि पृथ्वीच्या मध्यभागी चंद्र येतो अशा संधिकाळास वैज्ञानिक संशोधन शास्त्रात ग्रहण ही संज्ञा आहे

### हे एक नैसर्गिक अज्ञान आहे....कारण

सुर्य आणि पृथ्वीच्या मध्ये चंद्र येतो, अशी कोणतीही स्थिती होत नाही. चंद्र, पृथ्वी आणि सुर्य कोठे आहेत. या सर्वांमधे अगणित योजने अंतर आहे. पृथ्वीच्या सभोवती जे वायुमंडळ आहे त्याला गुरुत्वाकर्षण संज्ञा आहे त्यामुळेच ही घडण चराचर, क्षराक्षर व परात्परात घडते. हे गुरुत्वाकर्षण अनादी काळापासून अनंतांनी येणे परब्रम्हांनी निर्मित केले आहे.

सुर्य, चंद्र आणि पृथ्वी सारे अचल आहेत व ते आपली कक्षा कधीही सोडत नाहीत. ज्या अवधीत पृथ्वीची अगदी किंचित हालचाल होते त्या अवधीला वैदिक शास्त्रात ग्रहण म्हणतात. भुतलावर जे नाविन्यपूर्ण नैसर्गिक बदल व्हावयास हवे असतात, ते या ग्रहणामुळे होतात. ग्रहणामुळेच गतीगतीने निसर्गाच्या हवामानात बदल होतो. उदाहरणार्थ, आपण पाहतो काही काळापूर्वी पर्जन्यवृष्ठी जून महिन्यात म्हणजे वैशाख अखेर आणि जेष्ठ महिन्यात होत असे, ती आता त्या अवधित होत नाही. म्हणजे जेंव्हा सुर्य आणि पृथ्वी आपली कक्षा थोडीशी बदलते तेव्हांच ग्रहण म्हणजे निसर्गामधे बदल होतो आणि हवामानाचा कालावधी गतीगतीने पूढे सरकतो.

पृथ्वी सुर्याभोवती फिरते हीच मती वैज्ञानिक संशोधनाद्वारे मानवात प्रचलीत आहे. परंतू जर पृथ्वी फिरत असती तर आपण सारे स्थिरच राहू शकणार नाही. वास्तविकतः पृथ्वीदेखिल स्वतःभोवती अथवा सुर्याभोवती फिरत नसून तीच्या सभोवतालचे जे वायुमंडळ येणे गुरुत्वाकर्षण आहे ते तीच्याभोवती भ्रमण करीत असते. परंतू मानवाला पृथ्वी स्वतःभोवती व सुर्याभोवती फिरत आहे असा आभास होत आहे आणि हीच त्या परमेश्वराची किमया आहे. याचा अर्थ असाही होतो की दिवस व रात्र देखिल पृथ्वी स्वतः भोवती फिरण्यामुळे होत नसुन तिच्या सभोवतालच्या गुरुत्वाकर्षणाचाच तो प्रभाव आहे.

मानवाने या भुतलावर वैज्ञानिक संशोधनाच्या माध्यमातून अगणित अनैसर्गीक कुरघोडी केल्यामुळे आता संकटमय स्थिती निर्माण होणार आहे. आपण पाहू याच नैसग्रिक ग्रहणाच्या माध्यमातून निसर्गात गतीगतीने अधिकाधिक बदल होऊन पुनश्य प्रथमावास्थेची स्थिती होणार आहे आणि हे निसर्गाचे कालचक्र युगे-युगे असेच चालत रहाणार.

याचा शोध घेणे हे एक आजच्या वैज्ञानिक जगताला फार मोठे आव्हान आहे, ज्याची सत्यता गुरुत्वाकर्षणावर लक्ष क्रेंद्रित केल्यास काही अवधितच समजेल.